### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे विचार : खंड २

# हिंदु राष्ट्राच्या स्थापनेची दिशा

मराठी (Marathi)


**संकलक**

**श्री. चेतन धनंजय राजहंस**

(प्रवक्ते, सनातन संस्था)




## सनातन संस्था


**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४३, इंग्रजी २०१, कन्नड १९७, हिंदी १९५, गुजराती ६८, तेलुगु ४५, तमिळ ४३, बंगाली २९, मल्ल्याळम् २४, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**डिसेंबर २०२३ पर्यंत ३६४ ग्रंथांच्या १३ भाषांत ९४ लाख ९३ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

## सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचे अद्वितीय कार्य आणि वैशिष्ट्ये यांचा संक्षिप्त परिचय



१. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष आणि कार्यारंभ (वर्ष १९९८)

२. हिंदु राष्ट्र, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर ग्रंथ-निर्मिती

३. हिंदूंना धर्मशिक्षण देणे, हिंदु धर्मरक्षण आणि हिंदु राष्ट्र-स्थापना यांविषयी हिंदूंचे प्रबोधन करणे, यांसाठी नियतकालिक 'सनातन प्रभात' मधून मार्गदर्शन

४. हिंदु राष्ट्राची छोटी प्रतिकृती असणाऱ्या सनातन आश्रमांची निर्मिती

५. साधनेचा संस्कार दृढ झालेले सहस्रो धर्मप्रसारक सिद्ध करणे

६. हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी, देशभक्त आणि सामाजिक कार्यकर्ते यांचे संघटन अन् त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन

७. भावी हिंदु राष्ट्राचे दायित्व सांभाळण्यासाठी पुढील पिढ्यांना सक्षम करणे

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा - www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वा ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। - जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## ग्रंथाच्या संकलकांचा परिचय



**श्री. चेतन राजहंस (प्रवक्ते, सनातन संस्था)**

'सनातन धर्मवीर' उपाधीने सन्मानित असून विविध दूरचित्रवाहिन्यांवर हिंदु धर्माची बाजू मांडतात. सनातनच्या ग्रंथांचे संकलन आणि हिंदूसंघटनार्थ प्रवास करतात. गोवा येथील 'अखिल भारतीय हिंदु राष्ट्र अधिवेशना'च्या आयोजनात सक्रीय सहभाग असतो.

---

## ग्रंथाची अनुक्रमणिका


प्रकरण १ : 'हिंदु राष्ट्र' : मूलभूत विचार ९

प्रकरण २ : हिंदु राष्ट्राच्या स्थापनेच्या दृष्टीने साधनेचे महत्त्व १८

प्रकरण ३ : हिंदु राष्ट्राच्या स्थापनेच्या दृष्टीने ब्राह्मतेजाचे महत्त्व २९

१. ब्राह्मतेज म्हणजे काय ? २. ब्राह्मतेजाची आवश्यकता २९

प्रकरण ४ : हिंदु राष्ट्राच्या निर्मितीतील सूक्ष्मातील 'देवासुर युद्ध' ! ३४

प्रकरण ५ : हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी सांप्रदायिक ऐक्य हवे ! ४१

१. सर्व संप्रदायांमधील निःस्वार्थी आणि अहंभावशून्य अनुयायांद्वारे हिंदु राष्ट्राची स्थापना शक्य ! ४१

२. हिंदु राष्ट्र-स्थापनेच्या दृष्टीने संत व संप्रदाय यांचे महत्त्व ! ४१

प्रकरण ६ : हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी एकत्रित कार्य करण्याची दिशा ! ४३

प्रकरण ७ : हिंदु राष्ट्राच्या स्थापनेतील विचारवंतांचे महत्त्व ४७

३. विचारवंतांची भूमिका ४. विचारांची दिशा ४७

प्रकरण ८ : हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचे प्रत्यक्ष कार्य ५१

१. स्तर आणि स्वरूप २. घटक ५१

प्रकरण ९ : हिंदु राष्ट्र-स्थापनेच्या भावी काळातील कार्याची दिशा ६२

प्रकरण १० : हिंदु राष्ट्राच्या स्थापनेच्या कार्यात सहभागी व्हा ! ६६


---

**टीपा** १. ग्रंथातील प्रत्येक विचाराच्या शेवटी कंसात दिनांक / वर्ष दिले आहे. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांनी त्या दिवशी ते ते विचार लिहिले आहेत.

२. ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या 'सच्चिदानंद परब्रह्म' या उपाधीविषयी विवेचन !

१३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म' ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये 'प.पू.' आणि 'परात्पर गुरु' या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

## सनातनच्या दोन सद्गुरूंच्या नावांच्या आधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ यांना 'श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ' आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना 'श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ' असे संबोधले जात आहे. या संतद्वयी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत.

## मनोगत

हिंदु धर्म आणि भारतवर्ष यांचे वैशिष्ट्य असे की, येथे भविष्यात घडणाऱ्या अद्वितीय घटनांचा उच्चार त्या घडण्यापूर्वी होतो. वाल्मिकि ऋषींनी अलौकिक प्रतिभादृष्टीतून प्रथम रामायण रचले. तद्नंतर प्रभु श्रीरामाचा अवतार झाला आणि ऐतिहासिक 'रामराज्य' पृथ्वीतलावर अवतरले. भगवान श्रीकृष्णाच्या जन्माच्या पूर्वीही दैवी आकाशवाणी झाली. आकाशवाणीनुसार जन्मलेल्या भगवान श्रीकृष्णाने धर्मसंस्थापना केली आणि पुनश्च पृथ्वीवर 'धर्मराज्य' अवतरले. अध्यात्मातील अधिकारी व्यक्ती असलेल्या परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी सर्वप्रथम १९९८ या वर्षी 'भारतात वर्ष २०२३ ते २०२५ या कालावधीत 'ईश्वरी राज्य' म्हणजे 'हिंदु राष्ट्र' स्थापित होईल', असा विचार द्रष्टेपणाने मांडला होता. तेव्हापासूनच ते 'हिंदु राष्ट्र' या विषयावर सातत्याने वैचारिक आणि आध्यात्मिक स्तरांवरील लिखाण करत आहेत. या विचारांत आगामी काळात होणाऱ्या आदर्श राष्ट्ररचनेचे, म्हणजेच धर्मसंस्थापनेचे बीज रोवलेले आहे. हिंदु राष्ट्राच्या स्थापनेविषयी कोणत्याही आशादायी घटना स्थुलातून घडत नसतांना 'हिंदु राष्ट्रा'विषयी सांगणे, ही काहींना अतिशयोक्ती वाटेल; पण काळाची पावले ओळखणाऱ्या संतांना त्या उज्ज्वल भविष्याची चाहूल लागली आहे. आपण त्या दिशेने प्रयत्न करणे, ही आपली साधना आहे.

परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी वेळोवेळी 'हिंदु राष्ट्र' या विषयासंबंधी लिहिलेल्या एकूण विचारांपैकी केवळ हिंदु राष्ट्राच्या स्थापनेची दिशा देणाऱ्या विचारांचाच या ग्रंथात समावेश केलेला आहे. हा ग्रंथ म्हणजे परात्पर गुरु डॉ. आठवले यांचा विचारसंग्रह असून त्यात त्यांचे स्फूटलेख आणि लेख या दोन्हींचा अंतर्भाव आहे. 'हिंदु राष्ट्र' या शब्दाची व्याख्या अनेक विचारवेत्त्यांनी भूगोल, इतिहास, संस्कृती आणि तत्त्वज्ञान यांच्या आधारे केली आहे. परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी 'हिंदु राष्ट्र' या विषयाची आध्यात्मिक दृष्टीकोनातून मांडणी केली आहे. विश्वकल्याणाची व्यापक आध्यात्मिक शिकवण देणाऱ्या भारतातच नव्हे, तर पृथ्वीवर सर्वत्र 'हिंदु राष्ट्र' स्थापन करणे, ही एक आध्यात्मिक प्रक्रिया आहे, हे या ग्रंथातून सहज लक्षात येईल.

स्वातंत्र्यवीर सावरकर, आद्यसरसंघचालक डॉ. हेडगेवार, पू. गोळवलकरगुरुजी आदी थोर पुरुषांनीही हिंदु राष्ट्राचा विचार प्रखरपणे मांडला. दुर्दैवाने स्वयंभू हिंदु राष्ट्र असलेले भारतवर्ष हे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर धर्मनिरपेक्ष राष्ट्र बनले आणि 'हिंदु राष्ट्र' ही तेजस्वी संकल्पना झाकोळून गेली. जेथे 'रामराज्य' प्रत्यक्षात अवतरले, ते राज्य आज एक दंतकथा ठरवली जात आहे. छत्रपती शिवरायांनी स्थापिलेले 'हिंदवी स्वराज्य' म्हणजेच 'हिंदु राष्ट्र' विस्मृतीत नेऊन त्याला 'धर्मनिरपेक्ष राज्या'च्या नावाखाली 'हिरवा रंग' फासण्याचा खटाटोप केला जात आहे. त्याहीपुढे जाऊन 'हिंदु राष्ट्र म्हणजे धर्मांधता', असा अपप्रचार हेतूपूर्वक केला जात आहे. या धर्मनिरपेक्षतेमुळे देशासमोर असंख्य समस्या निर्माण झालेल्या असूनही धर्मनिरपेक्षतेविषयी अंधश्रद्धा बाळगणाऱ्यांना आजही भारत हे 'धर्मनिरपेक्ष राज्य' म्हणूनच हवे आहे. 'हिंदु राष्ट्र' हा विषय त्यांच्या खिजगणतीतही नाही. त्यांना हे ज्ञात नाही की, 'धर्मनिरपेक्ष राज्य' कि 'हिंदु राज्य' हा खरा प्रश्न नसून 'इस्लामी राज्य कि 'हिंदु राज्य ?', असा प्रश्न येत्या काही वर्षांत उत्पन्न होणार आहे. अशा परिस्थितीत केवळ हिंदूसंघटन करणारी विचारधाराच या देशाचे रक्षण अन् हिंदु राष्ट्राचे निर्माण करू शकते. हिंदु राष्ट्राच्या आकांक्षा सफल होण्यासाठी हिंदु समाजाचा हिंदु राष्ट्राविषयीचा विचार, उच्चार आणि आचार सर्वत्र एकसमान दिसला पाहिजे. म्हणूनच 'हिंदु समाजातील विविध घटक, उदा. हिंदु संघटना, संप्रदाय, संत, अधिवक्ते, विचारवंत आदींनी 'हिंदु राष्ट्र' स्थापनेसाठी काय प्रयत्न केले पाहिजेत', याचे दिशादर्शन या ग्रंथामध्ये केले आहे.

परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या प्रेरणादायी विचारांतून स्फूर्ती घेऊन आगामी काळात हिंदु समाजाला भारतभूमीत रामराज्याची अनुभूती देणारे 'हिंदु राष्ट्र' स्थापन करण्यासाठी खारीचा नव्हे, तर हनुमानाचा वाटा उचलण्याची प्रेरणा व्हावी आणि त्याने या कार्यासाठी शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक स्तरांवर अथक परिश्रम घ्यावेत, ही प्रभु श्रीरामाच्या चरणी प्रार्थना ! – **संकलक**